सन २०१८-१९ मध्ये केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानातील उपयोजने करीता ६० टक्के केंद्र हिश्श्यापोटी रू.२२.०० लक्ष व राज्य हिश्श्यापोटी ४० टक्के रु.१४.६७ लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-०८१८/प्र.क्र.४०७/आरोग्य-७

१० वा मजला , गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४००००१.
दिनांक : ३० मार्च, २०१९

वाचा :-

१) केंद्र शासनाचे आदेश क्र. L.१९०१६/०१/२०१८-NUHM, दिनांक १९ डिसेंबर, २०१९ चे पत्र.
२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसंकल्प-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८.
३) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/कें.रा.हि./१०३३८६-३९३/२०१८-१९, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ चे पत्र.
४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र.०५/कार्यासन-६, दिनांक २८ मार्च, २०१९.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानातील सन २०१८-१९ मध्ये केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानातील आदिवासी उपयोजनेकरीता ६० टक्के केंद्र हिश्श्याची व राज्य हिश्श्याची ४० टक्के अनुदान अर्थसंकल्पिय तरतुदीतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०१८-१९ या वर्षाकरीता रु.२२.०० लक्ष एवढे अनुदान आदिवासी उपयोजनेंतर्गत संदर्भ क्र.१ अन्वये वितरीत केलेले आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या ६०% रु.२२.०० लक्ष

तसेच केंद्र हिश्श्यास अनुसरुन राज्य शासनाचा समरुप ४०% राज्य हिस्सा रु.१४.६७ लक्ष खालील नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली वितरीत करण्यात येत आहेत. सदरचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

(रु.लाखात)

अ. क्र.	तपशील	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पिय मूळ तरतुद	वितरीत करावयाची तरतुद
१	आदिवासी विकास विभाग मागणी क्र.टी-५, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना (०१) (०३) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०F७४७	११६५.९१	२२.००
२	आदिवासी विकास विभाग मागणी क्र.टी-५, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना (०१) (०४) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०F८६३	७७७.२७	१४.६७

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च वरील तक्त्यातील तपशिलामध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ या वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. वित्त विभागाच्या दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.८ मधील मुद्दा क्र.१ ते १० मधील अटी व शर्तीची पूर्तता केली असल्याचे

कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र. १ ते १० मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरिल निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बॅक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. सदरचे अनुदान सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/ प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उदयोग उर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १३३/अर्थोपाय, दिनांक १६ मार्च, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903251652546317 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.03.30 12:30:43 +05'30'

(किरण वाहुल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.

३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
८. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१३.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१४.निवडनस्ती (आरोग्य -७) .